ॐ


# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त

मार्च २०२०

२२/१, मंगळवार पेठ,
पारगे चौक, पुणे ४११ ०११
(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
Email : wardhinee@gmail.com
Website : http :/www.swaroopwardhinee.org

❖ मासिक अंकाची किंमत रूपये ५/- ❖ वार्षिक वर्गणी रूपये १००/- (विशेषांकासह)

## चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १९४२,
## शार्वरी नाम संवत्सर



गुढी उंच ही नभात डोले
नवे वर्ष हे आले आले
अखिल धरेचे मंगल करण्या
सारे सारे सिद्ध जाहले ।

नवे वर्ष अन् नवीन निश्चय
नवीन स्वप्ने नवीन आशय
नवी दिशा अन् नवी भरारी
नवीन क्षितिजे नवी उभारी ।

शुभ आकांक्षा आमुच्या राहो
संकल्पांच्या पूर्तीसाठी
'जन्मशताब्दी' सार्थ करूया
भारतभूच्या कीर्तीसाठी ।

**नववर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा !**

### कष्ट आणि समर्पणाची कहाणी

समुपदेशन करण्यास आलेला गोपाळ (नाव बदललेलं आहे) त्याच्यामधली जिद्द पाहून मी अवाक झाले. त्याची एकच अडचण होती ती म्हणजे बारावी नंतरचे शिक्षण कोणत्या क्षेत्रात करावे, ह्याचे कोडे काही त्याला सुटत नव्हते.

'सध्या तुझे वेळापत्रक काय आहे? वर्धिनीत कसा जोडला गेलास? घरी कोण कोण असतात? आई बाबा काय करतात?' असे प्रश्न मी त्याला विचारले. गोपाळने हळूहळू घरचे सर्व चित्र काहीच वेळात माझ्यासमोर मांडले.

गोपाळ सहावीत असताना आईने दोन्ही मुलांना घेऊन घर सोडले. वडील दारूच्या व्यसनामुळे घरी आर्थिक मदत करायचे नाहीत. या सर्व गोष्टींमुळे आईने हा निर्णय घेतला.

आजीच्या घरी काही दिवस राहिलो. अचानक सर्व जबाबदारी आईवर आली. पण आई अजिबात खचली नाही. चार घरची कामे शोधली आणि नव्याने संसार सुरू केला. पण या जबाबदारीमुळे, आम्हा भावंडांना तिचा वेळ कमी मिळाला. पण आईने आम्हाला समजून सांगितले आणि तिला मदत होईल यासाठी आम्ही घरची कामे वाटून घेतली.

एक दिवस शाळेत 'स्व'रूपवर्धिनीचे काही कार्यकर्ते आले आणि त्यांनी वर्धिनीची माहिती सांगितली. घरी पण संपर्क करायला आले. आईने आम्हाला शाखेत जायला सांगितले. सातवीपासून वर्धिनीत येतोय. माझा धाकटा भाऊसुद्धा शाखेत जातो.

मी रोज पहाटे ४ ला उठून पेपर टाकायला जातो. त्याचे मला १७०० रुपये मिळतात. त्यातले मी १००० रुपये आईला देतो आणि ७०० रु. बस पाससाठी वापरतो. १० वीमध्ये मला ७८% गुण मिळाले.

मला शासनाकडून १५००० रुपये शिष्यवृत्तीचे मिळाले.

मग काय लगेच विचार केला, आई दहा घरची कामे करते, तिला गाडी घ्यावी. शिष्यवृत्तीचे पैसे आईला गाडी घ्यायला दिले. आता आईचा चालण्याचा त्रास कमी झाला. आईला आम्हाला खूप मोठं करायचे आहे. वर्धिनीसारख्या संस्थेची आम्हाला साथ मिळाली. कधी कधी विचार येतो वर्धिनी नसती तर कदाचित खूप मोठे स्वप्न पाहिले नसते. '१२ वी (कॉमर्स) ला उत्तम गुण मिळून मला पुढे खूप शिकायचे आहे, जेणेकरून आईला काम करावे लागणार नाही.' हे सांगून गोपाळ थांबला नाही तर म्हणाला 'महिन्यातून एकदा वडिलांना बघायला जातो.'

गोपाळचे हे सर्व ऐकून, डोळ्यातून पाणी आले. पण स्वत:ला सावरत त्याची पाठ थोपटली. मला त्याचा खूप अभिमान वाटला. आमचे पुढच्या वाटचालीसंदर्भात (करिअर) पुढच्या भेटीत बोलायचे ठरले. गोपाळ तर निघून गेला पण मनात अनेक प्रश्न सोडून...

कधी कधी आपण खूप छोट्या छोट्या तक्रारी घेऊन बसतो... पण गोपाळ आणि त्याची आई यांच्यासारखी मंडळी आपल्याला खूप काही शिकवून जातात.

**मेघा नगरे, समुपदेशन विभाग**

---

### युवा विभाग – ११ वी, १२ वी निर्माण शाखा

भाग १, ३ व ४ (संख्या ६), विषय – सामाजिक दृष्टिकोन संविधानाच्या माध्यमातून

आज दि. १२-०२-२०२०, ११ वी १२ वी निर्माण शाखेत संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. ह्यात प्रामुख्याने उद्देशिकेतील 'सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्याय' ह्या विषयात शासनाची जबाबदारी आणि नागरिकांचे कर्तव्य ह्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर संविधान अनुरूप सामाजिक, आर्थिक समानता आली आहे की नाही हे समजण्याकरिता युवकांनी १० सामाजिक प्रश्नांची यादी केली आणि पुणे स्टेशनजवळच्या पारधी समाजातील बांधवांची भेट घेतली. ह्या भेटीत युवकांनी दोन गट करून तेथील नागरिकांना शिक्षण, नोकरी, व्यवसाय, वैयक्तिक स्वच्छता आणि सुरक्षा ह्यासंबंधी प्रश्न विचारत सामाजिक विषमतेचा अंदाज घेतला. संविधानाने सुचवलेली सामाजिक आणि आर्थिक समानता येण्याकरिता आपण सर्व कटिबद्ध आहोत ह्याची जाणीव निर्माण करण्याचा हा प्रयत्न होता. भेटीच्या शेवटी युवकांनी वर्धिनीच्या प्रार्थनेच्या दुसऱ्या चरणाचे स्मरण केले आणि त्याचा अर्थ उलगडत सर्व पारधी आणि इतर समाजातील पिढ्या आपल्या शेजारी नांदतात. आपण त्यांच्यापासून काही वेगळे नाही. त्यांची दुःखं आपल्याला समजायला हवीत आणि सर्वांच्या सुखासाठी प्रयत्न करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे हे विचार घेऊन भेटीची सांगता झाली.

## शाखा विभाग

## १० वी, १२ वी शुभेच्छा समारंभ

दि. १३ फेब्रुवारीला इयत्ता १० वी व १२ वी चा शुभेच्छा समारंभ 'प्रबोध सभागृहा'मध्ये घेण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. दिलीप राठोड (C.A.), श्रीमती मनीषाताई पाठक व श्री. अरविंद केळकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन श्री. मंदार दादा पोफळे यांनी केले. कार्यक्रमात इयत्ता १० वी तील निवेदिता शाखेतील वर्धिका गायत्री मोरे हिने व १२ वीतील राजर्षी शाहू शाखेतील वर्धक पुष्कर सागडे यांनी त्यांचे मनोगत मांडले. गायत्रीने सांगितले, '१० वी च्या सुरुवातीस मनावर अभ्यासाचे खूप दडपण होते, पण शाखेतील ताईंनी व्यवस्थितरित्या अभ्यासाचे नियोजन करून घेतले व माझ्या मनातील भिती नाहीशी केली.' पुष्करने सांगितले, 'माझ्याकडे शाखेतील संपर्क व्यवस्था होती. ती व्यवस्था पार पाडत मी व्यवस्थित नियोजन करत अभ्यास केला व आता बारावीच्या परिक्षेसाठी उत्तम तयारी झाली आहे.'

श्री. दिलीप राठोड यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी त्यांच्या लहानपणापासूनची ते लेखा परीक्षक (C.A.) बनेपर्यंतची सगळी परिस्थिती सांगितली. त्यांनी कशा प्रकारे परिश्रमपूर्वक १० वी पर्यंतचं शिक्षण घेतलं व त्यानंतरचं महाविद्यालयीन शिक्षण काम करून केले व घरची जबाबदारी पार पाडत पूर्ण केले. आज यशस्वीरीत्या लेखा परीक्षक (C.A.) झाले. त्यांच्या मार्गदर्शनातून हे स्पष्ट झाले की **कुठलीही गोष्ट मिळविण्यासाठी, परिक्षेतील चांगले गुण मिळवण्यासाठी चिकाटीची गरज असते. श्री. दिलीप राठोड यांनी त्यांचे यश अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून मिळविले आहे.** उपेक्षित वस्ती व वंचित कुटुंबाची पार्श्वभूमी असलेल्या दिलीप राठोड यांनी अतिशय कमी वयात स्वयंप्रेरणेच्या बळावर हे यश मिळविले.

**स्वामी शिवानंद शाखा –** दि. ७-३-२०२० ला शाखेत 'परीक्षेची पूर्वतयारी' व पालकांची भूमिका' या विषयावर सौ. मेघा ताईंनी पालकांशी संवाद साधला. अभ्यासाचे नियोजन, घरातील मुलांशी संवाद इ. विषयांवर मुक्तपणे चर्चा झाली. पालकांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना शाखेत घेता येतील अशा नवीन कल्पना सुचवल्या. १० पालक उपस्थित होते.

**स्वामी दयानंद सरस्वती शाखा –** दि. ७ फेब्रुवारीला शाखेत 'तयारी शिकण्याची' या विषयावर युवक कार्यकर्ते श्री. शुभम जगताप सरांनी सत्र घेतले. शिक्षण कोणासाठी, कशासाठी, कुठपर्यंत, केव्हा, कसे आणि काय शिकायचे असे अनेक मुद्दे दृकश्राव्य (PPT) माध्यमातून वर्धकांसमोर मांडण्यात आले. यामुळे शिक्षणाचे महत्त्व आणि शिक्षण क्षेत्रातील विविध शाखा, सुविधा वर्धकांना माहीत झाल्या.



दि. २३ फेब्रुवारीला शाखेचा मकर संक्रमण उत्सव झाला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रियदर्शनी शाळेच्या संस्थापिका श्रीमती शशिकला कुंभार, सचिव श्री. महेश कुंभार उपस्थित होते. वर्धिनीचे कार्याध्यक्ष श्री. रामभाऊ डिंबळे सरांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमांमध्ये शाखेतील वर्धकांनी नाट्य सादरीकरणातून 'वर्धिनी १९७९ ते २०२०' सर्वांसमोर मांडली. यात नाटक, मनोरे, मैदानी खेळ, शारीरिक तसेच चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. पालकांसाठी किशाभाऊंच्या छायाचित्रांची प्रदर्शनी मांडण्यात आली होती.

**स्वामी श्रद्धानंद शाखा –** शाखेत वर्धकांना वेगवेगळ्या पद्धतीने शिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू असतो. 'आजचे विज्ञान हे उद्याचे भविष्य आहे' – 'Todays Science is future of tomorrow' म्हणून दर गुरुवारी व शुक्रवारी अत्याधुनिक तंत्रज्ञानांची (Advanced Technology) व रोबोटिक्स या विषयांवर माहिति देऊन कृतीसत्रेही घेण्यात आली. यातून शास्त्र विषयाचा अभ्यासही खूप महत्त्वाचा आहे हे सगळ्यांच्या लक्षात आले.

**स्वामी ब्रह्मानंद शाखा –** दि. २७ फेब्रुवारीला शाखेमध्ये 'शोध कल्पनांचा' या विषयावर वर्धकांचे चर्चासत्र झाले. 'वडील रात्री उशीरापर्यंत घरी आले नाहीत तर, आजूबाजूची मुले व्यसनाधीन झाली तर, १० दिवसांपासून परिसरात पाणीपुरवठा नीट झाला नाही तर शाखेला शाळेने परवानगी नाकारली तर' अशा काही समस्यांवर चर्चा झाली. या उपक्रमातून मुलांनी खूप चांगले पर्याय मांडले. यातून त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळाला. **जेवढ्या समस्या असतात तेवढेच उपायही निघू शकतात. प्रत्येक संकटाला उत्तर सापडतेच आणि एकजुटीने सामोरे गेल्याने समस्या दूर जातात हे मुलांच्या लक्षात आले.**

**धर्मवीर शंभूराजे शाखा –** शाखेचा मकर संक्रमण उत्सव २३ फेब्रुवारीला खूप उत्साहात साजरा झाला. श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांनी किशाभाऊंचे चरित्र मांडले. नवमहाराष्ट्र शाळेचे मुख्याध्यापक श्री. किशोर बोरसे, प्रियदर्शनी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कुमुदिनी मांडवकर, प्रेरणा शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुनंदा महाडिक यांच्या हस्ते वर्धकांना आदर्श वर्धक, अष्टपैलू खेळाडू, विशेष कामगिरी यासाठी बक्षीस वितरण झाले. 'सुंदर माझी शाखा' या नाट्य सादरीकरणाने 'स्व'–रूपवर्धिनीचे व शाखेचे काम सर्वांपर्यंत पोचले. प्रत्येक प्रसंगाला उपस्थित पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त पावती दिली. आपला पाल्य वर्धिनीसारख्या संस्थेत चांगलाच घडणार असा दृढविश्वास पालकांना मिळाला. कार्यक्रमा नंतर मिळालेल्या प्रतिक्रिया –



✻ श्री. किशोर बोरसे सर – शाखेतील वर्धकांची शिस्त, प्रात्यक्षिकांचे आयोजन, कार्यक्रमाचे नियोजन अप्रतिम होते. या कार्यात मी सहभागी होण्यास तयार आहे.

✻ सौ. कुमुदिनी मांडवकर – शाखेतल्या चिमुकल्या वर्धक, वर्धिकांनी अतिशय सुंदर प्रात्यक्षिके व कौशल्यपूर्ण कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाचे नियोजन, सूत्रसंचालन उत्तमरीतीने करणाऱ्या अकरावीतल्या कुपाटे व ननावरे या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक. मोठ्या संख्येने उपस्थित असणाऱ्या पालकांमुळे वर्धिनीबद्दलचे प्रेम, आपुलकी जावणली.

✻ सौ. सुनंदा महाडिक – नाट्य सादरीकरणातून शाखेची सखोल माहिती मिळाली. विद्यार्थी मित्रांवर संस्कार घडवून समाजाचा विकास करणारी संस्था म्हणजे 'स्व'–रूपवर्धिनी.

**क्रांतीज्योती सावित्री शाखा –** दि. २३ फेब्रुवारीला संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त शाखेत तसेच शाखेच्या जवळील घोरपडे उद्यानात स्वच्छता अभियान झाले. रविवारी उद्यानातील सफाई कामगारांना सुट्टी असते. त्यामुळे हे अभियान आवश्यकतेप्रमाणे परिणामकारक झाले. बागेतील सुरक्षारक्षकांच्या परवानगीने तेथील स्वच्छता साहित्य वापरून सर्व वर्धिकांनी बागेची स्वच्छता केली. काही साहित्य प्रथमच वापरत होतो. त्याचीही माहिती काकांनी दिली. त्यामुळे काम खूपच सोपे आणि नियोजित वेळेत झाले. या श्रमदानाने सगळ्यांना सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व समजले. या उपक्रमानंतर शाखेतल्या ताईने संत गाडगेबाबांची माहिती सांगितली.

**भगिनी निवेदिता शाखा –** १५ जानेवारीला संक्रांतीचा तिळगूळ देण्यासाठी सर्व वर्धिका सौ. मंजूषाताई व सौ. कोमलताई या वर्धिनीच्या कार्यकर्त्यांकडे गेल्या होत्या. घरी संपर्क झाल्याने मुलींना हा उपक्रम आवडला. त्यांची घरातल्या सर्वांशी ओळख झाली. गप्पा व पद्य ही झाले. तसेच २५ जानेवारीला श्रीमती बागेश्रीताईंनी व ८ फेब्रुवारीला श्री. रामभाऊ डिंबळे सरांनी मुलींशी संवाद साधला. बागेश्रीताई शाखेच्या सुरुवातीपासून कामात आहेत. त्यांचे त्यावेळेचे अनुभव त्यांनी सांगितले तर रामभाऊ सरांनी मुलींना आपल्या ठरवलेल्या ध्येयाकडे ते साध्य होण्यासाठी आपण काय काय केले पाहिजे याचे मार्गदर्शन केले. या अनौपचारिक गप्पांतून मुली खूप उत्साही झाल्या. इ. ८ वी व ६ वीच्या वर्धिकांच्या प्रयोगाची विज्ञान दिनासाठी निवड झाली. इ. ६ वीच्या गटाने ''नैसर्गिक रंगद्रव्य'' व

''पर्यावरणपूरक शीतपेटी'' हे दोन प्रयोग मांडले. त्यातील ''नैसर्गिक रंगद्रव्य'' प्रयोगाला तिसरा क्रमांक मिळाला व इ. ८ वीच्या गटाने विद्युत बेल व डी. सी. जनरेटर हे प्रयोग मांडले. त्यातील विद्युत बेल अंतिम फेरीपर्यंत पोहोचला.



**राजर्षी शाहू शाखा –** शाखेचा शाहू करंडक पर्व २ सुरू आहे. या अंतर्गत गटशः वेगवेगळ्या स्पर्धा/कार्यक्रम घेतले गेले. दि. २ फेब्रुवारीला शाखेचा संक्रमण उत्सव साजरा झाला. श्री. अरविंद केळकर सरांनी किशाभाऊंची जीवनगाथा मांडली. वर्धकांनी पद्य व मनोगतातून 'मी व माझी शाखा' हा विषय सर्वांपर्यंत सहज सोप्या पद्धतीने पोचविला. तसेच शाहू करंडक पर्व १ यामध्ये घेतल्या गेलेल्या विविध स्पर्धांतील विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.

दि. ९ फेब्रुवारीला 'आकाशवाणी (रेडियो)' विषयावर स्पर्धा झाली. चारही गटांनी आकाशवाणी कशी असते, तिचे उपयोग, प्रकार, आपण त्यावरील कार्यक्रम घरबसल्या कसे ऐकू शकतो, अशा विविध मुद्द्यांवर माहिती गोळा केली होती. दि. १० फेब्रुवारीला गट क्र. १ ने छायाचित्रण व चित्रकला (Fine Arts) यांबद्दल प्रदर्शनी मांडली. १० वी नंतर असे वेगळे विषय घेऊन शिकता येते, तसेच मांडलेल्या प्रदर्शनीतून या क्षेत्रात आपण पुढे करिअर करू शकतो याची माहिती सर्वांना मिळाली. गट क्र. २ ने शाखेतल्या पुष्कर दादासाठी (१२ वी परीक्षेसाठी) शुभेच्छा समारंभाचे आयोजन केले. गट क्र. ४ ने 'मराठी राज्यभाषा दिना'निमित्त श्री. आनंद ओक यांचे व्याख्यान आयोजित केले. ओक सरांनी मराठी भाषेचा इतिहास व त्याचे बदलते स्वरूप मुलांसमोर मांडले. १००–२०० वर्षांपूर्वीची मराठी भाषा कशी होती हे दाखवणारे ग्रंथही त्यांनी आणले होते. ते मुलांनी बघून त्यावर प्रश्नोत्तरे झाली.

दि. १९ फेब्रुवारीला शिवजयंती निमित्त गट क्र. ३ व ४ यांनी कार्यक्रमाचे नियोजन आखले. कार्यक्रमाची सुरुवात मशाल फेरीने झाली. शाखेच्या दादाने अक्षय मुळे याने प्रतापगडावरील प्रसंग पोवाड्यातून सादर केला आणि सुरेशदादा पवार याने शिवचरित्रातील गोष्टींतून 'महाराजांचे अचूक नियोजन व त्याचे महत्त्व' सर्वांच्या लक्षात आणून दिले.

दि. २९ फेब्रुवारीला शाहू करंडक पर्व २ यातील विजेत्या गटाला तसेच वर्धकांना श्री. ज्ञानेश पुरंदरे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. सरांनी शिवचरित्रातील गोष्टी मुलांना सांगितल्या.

**स्वामी विवेकानंद शाखा –** दि. १४ फेबुवारीला शाखेत मातृ–पितृ पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. पालकांचा उत्तम प्रतिसाद होता. काही पालकांनी मुलांसाठी शाखा का महत्त्वाची हे आपल्या मनोगतातून मांडले. प्रश्नमंजुषेच्या आधारे मुलांना आपल्या पालकांबद्दलची किती माहिती आहे हे जाणून घेतले. युवकांनी व मुलांनी या दिनासाठी स्वतः रचलेल्या कविता सादर केल्या.

❖❖❖

---

**स्पर्धा परीक्षा केंद्र**

**अभिनंदन**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या लिपिक व टंकलेखन परीक्षेमध्ये –
१) योगेश काटे २) वैजनाथ साळवे ३) निहाल रामटेके ४) रविशंकर चव्हाण
यांची **मंत्रालय लिपीक पदी** निवड झाल्याबद्दल **हार्दिक अभिनंदन.**

❖❖❖

## बालकांना मोफत शिक्षणाचा अधिकार (RTE)

**राईट टू एज्युकेशन ॲक्ट (RTE) –** हा कायदा कोणत्याही विशेष वर्गासाठी किंवा विद्यार्थी समूहासाठी नसून देशातील प्रत्येक बालकाला संविधानाने दिलेला अधिकार आहे. प्रत्येक बालकाला किमान इयत्ता १० वी पर्यंतचे शिक्षण शासनाने मोफत दिलेच पाहिजे असे 'सिस्कॉम' संस्थेचे देखील म्हणणे आहे. वस्तुस्थिती पाहता विना अनुदानित शाळा, खाजगी शिक्षण हे पूर्णपणे बंद करणे अशक्य असले तरी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करून शिक्षणाचा व्यापार करणाऱ्या शैक्षणिक संस्थांना रोखणे निश्चितच जनतेच्याच हातात आहे. विद्यार्थ्यांना किमान माफक दरात गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी तरी शासनाने उचलायलाच हवी या मतावर 'सिस्कॉम' संस्था ठाम आहे.

बालकांना समान संधी, संरक्षण व संपूर्ण सहभाग कायदा १९९६ प्रकरण ५, कलम २ (i) मधील तरतुदीनुसार केंद्र शासनाने बालकांना शिक्षणाचा अधिकार अधिनियम २१ ऑगस्ट २००९ मध्ये अंमलात आणला. या कायद्यातील अधिनियमातील कलम ३५ मधील तरतुदीनुसार २७ ऑगस्ट २००९ रोजी हा कायदा राज्यांनी लागू करण्याचे निर्देश देण्यात आले. ९ एप्रिल २०१० व २० जून २०१२ यामध्ये या अधिनियमात सुधारणा करण्यात आल्या.

२१ ऑगस्ट २००९ व २७ ऑगस्ट २००९ या अधिनियमांमधील ठळक मुद्दे –

❊ जात–पात, धर्म, मुलगा–मुलगी, संस्कृती, भाषा शैक्षणिक किंवा आर्थिकदृष्ट्या मागासलेले असे कोणत्याही प्रकारचे विभाग करून बालकाला शिक्षणापासून वंचित ठेवता येणार नाही.

❊ ६ ते १४ वयोगटातील किंवा इयत्ता १ ते ८ पर्यंत मुलांना मोफत शिक्षण देणे केंद्र शासन व राज्य शासनावर बंधनकारक आहे. शारीरिक किंवा बौद्धिकदृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांसाठी ही वयोमर्यादा १६ वर्ष करण्यात आली आहे.

❊ राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरणाने शालेय शिक्षणासोबत बालकास शैक्षणिक साहित्य (पाठ्यपुस्तके, लेखन साहित्य, गणवेश इ.) मोफत पुरविणे आवश्यक असेल.

❊ इतर कोणत्याही शाळेतील बालकास शालेय शिक्षण व त्यासोबत इतर सुविधा पुरविताना दुजाभाव होणार नाही हे पाहण्याची जबाबदारी शाळा, व्यवस्थापन व शिक्षकांवर राहील.

❊ मुलांना त्यांच्या घराच्या जवळच शाळेत म्हणजे इयत्ता १ ली ते ४ थीसाठी १ कि.मी. व इयत्ता ५ वी ते ८ वी साठी ३ कि.मी.मध्ये प्रवेश देण्याचे निर्देश दिले आहेत.

❊ जर लोकवस्तीच्या जवळ किंवा विद्यार्थ्यांच्या तुलनेत शाळा कमी असतील तर केंद्र शासनाच्या मदतीने राज्य शासनाने शाळा सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

❊ कोणतेही मूल शालाबाह्य राहणार नाही हे पाहण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासन व शिक्षकांची असेल. शालाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणताना गरज भासल्यास शिक्षकांनी अधिक वेळ शिकविण्याचे निर्देश दिलेले आहेत.

❊ जर डोंगराळ भागात किंवा दुर्गम ठिकाणी शाळा नसल्यास त्या भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी स्थानिक प्राधिकरणाने त्यांच्या प्रवासाची किंवा सर्व सोयीसुविधांसह राहण्याची व्यवस्था करावी.

❊ मोफत शिक्षणासाठी केंद्र शासनाच्या मदतीने राज्य शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने विद्यार्थी संख्येनुसार शाळा सुरू करणे आवश्यक असेल. परंतु जर पालकांनी आपल्या मुलांना विनाअनुदानित शाळेत घातले तर शुल्क परतावा मागण्याचा अधिकार पालकांना नाही.

❊ मुळातच शिक्षणाचा अभाव असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना शाळेत टिकवणे कठीण आहे हे शालाबाह्य विद्यार्थ्यांच्या संख्येवरून दिसून येते. अशा परिस्थितीत जर त्यांना खाजगी शाळेत घातले तर आपण इतरांपेक्षा वेगळे असल्याचे न्यूनगंड होण्याची दाट शक्यता आहे. अशा अनेक दुष्परिणामांचा बालमनावर होणारा परिणाम विचारात घेता या विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण देणे अधिक उत्तम पर्याय ठरेल असे संस्थेचे मत आहे.

शासन दरवर्षी शिक्षणावरील खर्च कमी करीत असल्याचा दावा शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत व विविध सघटनांकडून केला

जात आहे. ही वस्तुस्थिती ‘सिस्कॉम’ संस्थेला देखील मान्य आहे. शासकीय व खाजगी अनुदानित शाळा, RTE कायद्याअंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी दिला जाणारा शुल्क परतावा, शिष्यवृत्ती अशा अनेक प्रकारे शासन शिक्षणावर खर्च करीत आहे. शासनाचा खर्च वाढलेला दिसत असला तरी विद्यार्थी संख्या मात्र घटत आहे, वाढलेल्या खर्चाचा फायदा मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांना होताना दिसत नाही.

(खालील आकडेवारी महाराष्ट्र राज्याची आहे)

एकूण खाजगी अनुदानित, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा

| आर्थिक वर्ष (१+५) | शाळांचा एकूण खर्च रुपये (हजारात) (२+६) | एकूण विद्यार्थी संख्या (३+७) | प्रति विद्यार्थी प्रतीपूर्ती मान्य झालेली रक्कम रुपये | शासनाचा एकूण मंजूर खर्च (करोड रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| २०१२-१३ | ९४९४९०३२ | ९०८२४५८ | १२३१५ | २९.३३ |
| २०१३-१४ | १११८९९६३५ | ८८२६५७७ | १४६२१ | |
| २०१४-१५ | १२०१५४२३३ | ८९१७७२२ | १३४७४ | ३४.४० |
| २०१५-१६ | १३२१५२०१९ | ७६२५८५५ | १७३२९ | ८४.२० |
| २०१६-१७ | माहिती नाही | माहिती नाही | १७३२९ | १०० |
| २०१७-१८ | माहिती नाही | माहिती नाही | १७३२९ | १३० |

महाराष्ट्रातील शिक्षणाची वस्तुस्थिती व शैक्षणिक गुणवत्ता मांडताना खाली दिलेल्या तक्त्यातील आकडेवारी ही असर संस्थेच्या अहवालातील आहे.

महाराष्ट्रात एकूण १ लाख ११ हजार सरकारी शाळा आहेत. त्यापैकी ३७९६ शाळा १ शिक्षकी आहेत. रायगड-३७२, पुणे-२६५, रत्नागिरी-२५७, ठाणे-२३७, तर ३१४२ शाळा एका वर्ग खोलीत भरतात.

शासनाच्या सर्वेक्षणात कधी ७४ हजार तर कधी ५५ हजार तर कधी १० मुले शालाबाह्य असल्याचे जाहीर केले जाते. सामाजिक संस्थांच्या मते ४ लाखाहून अधिक मुले शालाबाह्य आहेत. डिसेंबर २०१७ मध्ये ४८३७९ मुले शालाबाह्य होती त्यापैकी ३२८५० मुले आजही शालाबाह्य आहेत.

तक्ता क्र. १ महाराष्ट्रातील शाळेत मुलांसाठी उपलब्ध असणाऱ्या सुविधा (टक्केवारी मध्ये)

| मुलांसाठी शाळेत उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा तपशील | २०१६ | २०१८ |
|---|---|---|
| मध्यान्ह भोजनसाठी स्वयंपाकाची व्यवस्था आहे. | ९५.६ | ९४.९ |
| शाळेत मध्यान्ह भोजन दिले जाते | ९४.५ | ९४.७ |
| पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | ६७.१ | ७०.९ |
| मुलांसाठी स्वच्छतागृह | ६७.९ | ७०.१ |
| मुलींसाठी स्वच्छतागृह | ६२.४ | ६३.९ |
| वाचनालय | ४५.९ | ३६.९ |
| वीज जोडणी केली आहे | ७८.३ | ७८.९ |
| संगणक | १७.८ | १९.० |
| खेळाचे साहित्य | | ६२.५ |
| खेळाचे मैदान | | ६७.२ |

* प्राथमिक सुविधांमध्ये स्वच्छ प्रकाश व खेळती हवा असणाऱ्या वर्ग खोल्या, प्रयोगशाळा, सुरक्षा व्यवस्था, प्रयोगशाळा, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी, CCTV, आग नियंत्रण व्यवस्था, समुपदेशन इ. प्राथमिक सुविधामध्ये याचा देखील समावेश असायला हवा.

तक्ता क्र. २ महाराष्ट्र शासनाचा शालेय शिक्षण व तंत्र शिक्षणासाठी अर्थसंकल्पात जाहीर केलेला निधी व विभागानुसार प्रत्यक्ष केलेला खर्च (टक्केवारीमध्ये)

| वर्ष | राज्याच्या स्थिर उत्पन्नानुसार शिक्षणावरचा खर्च % | एकूण उपलब्ध निधीपैकी प्राथमिक शिक्षणावर अपेक्षित खर्च ७५% आहे परंतु प्रत्यक्षात झालेला खर्च | एकूण उपलब्ध निधीपैकी तंत्र शिक्षणासाठी झालेला खर्च |
|---|---|---|---|
| २०१४-१५ | १७.३७ | ५२.५२ | २.१९ |
| २०१५-१६ | १५.८३ | ५२.७२ | २.२८ |
| २०१६-१७ | १६.४८ | ५२.६८ | १.९८ |
| २०१७-१८ | १५.६५ | ५५.८१ | २.११ |
| २०१८-१९ | १५.२५ | ५५.१० | २.०९ |

* शासनाकडे एकूण उपलब्ध झालेल्या निधीतून ७५% खर्च प्राथमिक शिक्षणावर व्हायला हवा परंतु सरासरी ५३.७७% प्राथमिक शिक्षणावर खर्च केला आहे तर तंत्र शिक्षणावर २५% खर्च व्हायला हवा असताना सरासरी २.१३% खर्च झालेला दिसतो.

तक्ता क्र. ३ शासनाकडे उपलब्ध झालेला निधी व प्रत्यक्ष झालेला खर्च (रक्कम हजार कोटी मध्ये)

| वर्ष (१) | अनुदान वितरण केंद्र शासन(२) | राज्य शासन(३) | जमा रकमेसह मंजूर अंदाजपत्रक (४) | प्रत्यक्ष खर्च (५) | तफावत (४)-(५)=६ | एकूण खर्च % |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१३-१४ | ६५६ | २५३ | १२९९ | ९१४ | ३८५ | ७०% |
| २०१४-१५ | ५६९ | ३२० | १४१८ | १०८६ | ३३२० | ७७% |
| २०१५-१६ | ४२० | ८५६ | १५७४ | १३०१ | २७३ | ८३% |
| २०१६-१७ | ६०८ | १३२८ | २२९६ | १९८१ | ३१५ | ८६% |

* वरील खर्चात प्रामुख्याने भौतिक सुविधा, शिक्षक प्रशिक्षण, शिक्षक अनुदान, बांधकाम, विद्यार्थ्यांचे गणवेश यांवर झाला आहे. शिक्षणाचा दर्जावाढ करण्यात राज्य शासन अपयशी ठरले. संविधान कलम २१ (अ) नुसार सर्व शिक्षा अभियान असफल ठरले आहे.

तक्ता क्र. ४ २०१८ मध्ये शाळेत जाणाऱ्या मुलांचा तपशील (टक्केवारीमध्ये)

| वय वर्ष | सरकारी शाळा | खाजगी शाळा | वय वर्ष | सरकारी शाळा | खाजगी शाळा |
|---|---|---|---|---|---|
| ६ ते १४ | ६१.६ | ३७.६ | ११ ते १४ | ४४.९ | ५३.८ |
| ७ ते १० | ७६.५ | २३.१ | १५ ते १६ | २०.२ | ७५.५ |
| ७ ते १६ | ५४.० | ४४.७ | | | |

* शासकीय शाळांचे प्रमाण अत्यल्प असल्याने इ. ८ वी च्या पुढे (वय वर्षे१४ नंतर) शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना नाईलाजास्तव खाजगी शाळेत प्रवेश घ्यावे लागते. यासाठी शासकीय शाळा किमान इ. १० वी पर्यंत असणे अनिवार्य आहे. शासकीय शाळेतील पट संख्या कमी होण्याचे हे देखील प्रमुख कारण आहे.

तक्ता क्र. ५ इयत्ता दुसरीची पुस्तके वाचायला दिली असता वाचनाचे केलेले मूल्यमापन

| वर्ष | इ. ३ री तील मुलांना वाचता आले सरकारी | खाजगी | इ. ५ वी तील मुलांना वाचता आले. सरकारी | खाजगी | इ. ८ वी तील मुलांना वाचता आले सरकारी | खाजगी |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१६ | ४१.१ | ३८.५ | ६३.१ | ६२.६ | ७५.२ | ७६.१ |
| २०१८ | ४४.२ | ३३.६ | ६६.० | ६७.१ | ७९.४ | ८०.१ |

✲ जर आडमाप शुल्क भरून शिक्षण उत्तम मिळत असेल तर खाजगी शाळेतील १००% मुलांना लिहिता वाचता यायला हवे होते. परंतु वरील आकडेवारी पाहता शासकीय शाळा व खाजगी शाळेत विशेष फरक दिसत नाही.

तक्ता क्र. ६ इयत्ता दुसरीमधील वजाबाकी भागाकार करता आले. त्यानुसार केलेले गणिताचे मूल्यमापन

| वर्ष | इ. ३ री तील मुलांना वजाबाकी करता आली | | इ. ५ वी तील मुलांना भागाकार करता आले | | इ. ८ वी तील मुलांना भागाकार करता आले | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सरकारी | खाजगी | सरकारी | खाजगी | सरकारी | खाजगी |
| २०१६ | २२.४ | २९.० | १९.७ | २१.७ | ३२.४ | ३१.० |
| २०१८ | २८.१ | २३.३ | ३१.७ | २८.० | ४१.४ | ४०.४ |

✲ गणिताबाबतची सरासरी आकडेवारी पहाता खाजगी शाळेच्या तुलनेत शासकीय शाळेची प्रगती अधिक चांगली असल्याचे दिसते.

अहवाल प्रकाशित झाले की शासकीय शाळांवर ताशेरे ओढायला सुरुवात होते, परंतु खाजगी विनाअनुदानित शाळेबाबात मात्र कोणीच वाच्यता करत नाही. किंवा त्यांची वस्तुस्थिती देखील जाहीर केली जात नाही. त्यामुळे पालकांचा ओढा खाजगी विनाअनुदानित शाळेकडे अधिक असल्याचा दिसतो.

त्यामुळे खाजगी विनाअनुदानित शाळेत २५% जागा राखीव ठेवून त्यांना शिक्षण मिळेलच असे नाही. समान शिक्षणाऐवजी दर्जेदार शिक्षणाची मागणी शासनाकडे करायला हवी. कारण शिक्षण हा जनतेचा अधिकार आहे तर शासनाची जबाबदारी. खाजगी विनाअनुदानित शाळेत मिळणाऱ्या शिक्षणाची जबाबदारी शाळेची किंवा शासनाची नाही. परंतु शाळेने निश्चित केलेले अवाजवी शुल्क भरण्याची जबाबदारी पालकांची निश्चितच आहे.

**संस्थेची भूमिका –**

शासनाचा शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचा लाभ मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी, पालकांना मिळावा यासाठी RTE कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

✲ जर 'एक देश एक शिक्षण' धोरण अंमलात आणल्यास त्या अंतर्गत शाळा महाविद्यालयांना सर्व नियम एकसमान असून संपूर्ण देशाचा अभ्यासक्रम एकच असल्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना शासकीय शाळेतून मोफत शिक्षण घ्यायचे की विनाअनुदानित शाळेतून शुल्क भरून प्रवेश घ्यायचा हा निर्णय पूर्णपणे पालकांचा असेल.

✲ कायद्यातील तरतुदी व घटनात्मकदृष्ट्या सर्वांना समान शिक्षण मिळणार असल्यामुळे विविध स्तरावर शिक्षणासाठी होणारा खर्च एकत्रित करून या रकमेचा उपयोग शासकीय अनुदानित शाळांचे आधुनिकीकरण करून सुशोभित केल्या, आणि शासकीय शाळा कशा उत्तम आहेत याची प्रभावी जाहिरात केल्यास पालकांचा या शाळेकडे कल वाढेल.

✲ विनाअनुदानित शाळेप्रमाणे शासनाने शाळेच्या आवारात/वर्गात सुट्टीच्या दिवशी किंवा सुट्टीच्या कालावधीत शासकीय नियमानुसार मान्यताप्राप्त (उदा. कराटे, स्केटिंग, नृत्य, वाद्य वादन इ.) प्रशिक्षण वर्ग नाममात्र शुल्कात चालवून त्यासाठीच्या परीक्षांचे आयोजन केल्यास अध्ययन क्षमता कमी असलेले विद्यार्थी व शालाबाह्य मुलांसाठी व इतर विद्यार्थ्यांसाठी हा एक उत्तम पर्याय ठरेल. असे करताना शासनावर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही.

✲ शासन सर्वांना मोफत शिक्षण द्यायला बांधिल आहे. परंतु जर त्या मुलांनी शासकीय शाळेत प्रवेश घेतला तर हे ठासून सांगता आले पाहिजे. अशा वेळी गरज भासल्यास जनतेच्या मागणीनुसार नवीन शाळा सुरू करण्याची तयारी शासनाने दाखविली पाहिजे.

**– वैशाली बापट**

Director, Syscom
7620612202

❖❖❖

**स्पर्धा परीक्षा केंद्र**

**अभिनंदन**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये -

१) सुप्रिया जगताप

२) वर्षाराणी सुतार

३) माधुरी किर्वे

४) अविनाश घोरपडे

५) संतोष देशमुख

यांची **पोलिस उपनिरीक्षक**पदी निवड झाल्याबद्दल

'स्व'-रूपवर्धिनी परिवारातर्फे

**हार्दिक अभिनंदन**

## शाखा विभाग

### मैदान प्रमुख निवासी प्रशिक्षण वर्ग



दि. १५-२-२०२० व १६-२-२०२० रोजी भावे शाळा, पुणे येथे मैदान प्रमुखांचा निवासी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. यावेळी ३० युवक-युवती/वर्धक-वर्धिका उपस्थित होते. यामध्ये शाखांचे मैदान प्रमुख, सहाय्यक व मैदान समितीमधील सदस्य होते.

दि. १५-२-२०२० संध्याकाळी ६ वा. सर्वांचे एकत्रीकरण करण्यात आले. सर्वप्रथम मैदानावर सर्वांचे प्रशिक्षण घेण्यात आले. ज्यामध्ये शारीरिक कौशल्यांचे ट्रेनिंग देण्यात आले व शाखावर असलेले साहित्य योग्यपणे कसे वापरायचे याची माहिती देऊन शास्त्रशुद्ध प्रशिक्षण झाले. हे सत्र जितेंद्र काळे दादानी घेतले. यानंतर मैदानाचा आढावा व अडचणी याविषयी सर्वांशी चर्चा करण्यात आली.

रात्रीच्या सत्रामध्ये निलेश धायरकर यांनी मैदानातील खेळ नक्की का घ्यावे हे सांगितले, यामध्ये विविध कौशल्ये कशी आत्मसात होतात हे सांगितले. खेळ हा एकत्र येण्यासाठी व लोकांमधील एकी वाढवण्यासाठी खेळले जावेत, असेही त्यांनी सांगितले.

दि. १६-२-२०२० रोजी सकाळी सर्वांची उपासना ओंकारेश्वर मंदिरात घेण्यात आली व मंदिरातील परिसरात सर्वांचे सूर्यनमस्कार प्रशिक्षण घेण्यात आले. यामध्ये सूर्यनमस्कारांच्या स्थिती, मंत्र याविषयी माहिती सांगण्यात आली. सकाळच्या मैदानात खेळ कसे घ्यावे, व्यायाम कसा घ्यावा या सगळ्याची माहिती देण्यात आली.

समारोप सत्रात डॉ. विनेश नगरे यांनी खेळाचे महत्त्व आपल्या आयुष्यात किती आहे हे सर्वांना पटवून सांगितले व खेळ हा मैदानापुरताच मर्यादित नसून याचा उपयोग आपल्या दैनंदिन आयुष्यातही होतो असे त्यांनी सांगितले.

### उडान २०२० विज्ञान दिन आढावा

'स्व'-रूपवर्धिनी आयोजित 'उडान २०२०' विज्ञान दिन उद्याच्या सक्षम भारताच्या वैज्ञानिकांचा मेळावा जगताप विद्यालय, हिंगणे खुर्द, पुणे येथे पार पडला. सिंहगड रोड, कर्वेनगर भागातील २० शाळांचा सहभाग होता. यामध्ये २०० पेक्षा अधिक प्रयोग, प्रतिकृती व ७०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एवढ्या लहान वयात लोकांना आश्चर्यचकीत करतील असे प्रयोग त्यांनी सादर केले. त्यांची योग्य पद्धतीने मांडणी परीक्षकांसमोर मांडली. 'विज्ञान दिन' प्रचंड जोशाने, प्रकल्पांनी पार पडला.

पालक, शिक्षक व परिसरातील स्थानिक नागरिक यांनी मोठ्या प्रमाणात विज्ञान दिनास भेट दिली. या विज्ञान

दिनास प्रमुख वक्ते मा. सुहास काणे, निवृत्त उपसंचालक, संरक्षण अनुसंधान संस्था व प्रमुख पाहुणे डॉ. जालिंदर आंबेकर हे उपस्थित होते.



या मेळाव्यात इयत्ता ५ वी व ६ वी साठी स्वच्छता, टाकाऊपासून टिकाऊ, पर्यावरण व हवा, पाणी हे चार विषय विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. या बाल वैज्ञानिकांनी उत्तम प्रकारचे प्रयोग प्रतिकृती तयार केल्या होत्या. या बाल वैज्ञानिकांनी मांडलेल्या प्रयोगाची माहिती प्रभावीपणे लोकांना सांगितली. त्याच पद्धतीने इयत्ता ७ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांना, जलसंवर्धन, शहरातील समस्या व उपाय, टेक्नॉलॉजी व उपकरणे हे ४ विषय दिले होते. या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम प्रकारचे प्रयोग, मॉडेल्स तयार केले होते. यामध्ये वाहतूक, कचऱ्याचे व्यवस्थापन, तंत्रज्ञान या पद्धतीचे विविध प्रयोग मुलांनी सादर केले.



विज्ञान दिन उडान २०२० या कार्यक्रमाच्या समारोप सत्रामध्ये प्रमुख पाहुणे डॉ. जालिंदर आंबेकर सरांनी विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचे कौतुक केले. आपल्या शहरातील समस्यांवर चर्चा करण्यात आली. त्यांवर विद्यार्थ्यांनीच उपाय सुचवले. प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन झाल्यानंतर बक्षिस वितरण करण्यात आले. स्वामी दयानंद सरस्वती शाखेतली इ. ७ वीमधील वर्धक आदित्य गिरमे व रोहित गिरमे यांना प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले. भगिनी निवेदिता शाखेतील इ. ६ वीच्या गटातील 'नैसर्गिक रंगद्रव्य' ह्या प्रयोगाला तिसरा क्रमांक मिळाला.

❖❖❖

---

## अठरा पगड विद्यालय

**संकल्पना :**

वर्धिनी ही समाजातील सामाजिक आर्थिकदृष्ट्या अविकसित गटातील विद्यार्थ्यांकरिता गेली ४० वर्षे काम करीत आहे. त्याचा समाजावरील परिणामही अत्यंत परिणामकारकपणे आपण पाहत आहोत. जन्मशताब्दी निमित्ताने आपले हेच प्रयत्न अजून थोडे वाढवून समाजातील अठरा पगड ज्ञातींपर्यंत हेतुपुरस्सर पोहोचण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. शनिवार दु. ४ ते ७ व रविवारी सकाळी ९ ते १२ अशी या विद्यालयाची वेळ आहे.



**उद्‌घाटन :**

जन्मशताब्दी वर्षातील ५ उपक्रमांपैकी आगळा वेगळा उपक्रम म्हणजे अठरा पगड विद्यालय. विद्यालयाचे उद्‌घाटन २६ जानेवारी २०२० रोजी मा. नगरसेविका राजश्रीताई काळे यांच्या हस्ते झाले. त्याची पूर्वतयारी नोव्हेंबर डिसेंबर महिन्यापासून अत्यंत नियोजनपूर्वक करण्यात आली होती.

**पूर्वतयारी :**

डिसेंबर महिन्यामध्ये वस्ती विकास प्रकल्पातील अभ्यासिका प्रमुख आणि आपले कार्यकर्ते यांनी २० वस्त्यांमधील १५ ज्ञाती समुहातील १२९ विद्यार्थ्यांच्या घरी भेटी दिल्या. तसेच त्या-त्या वस्तीतील वस्तीमित्रही निश्चित केले गेले. त्यांच्या मदतीने या मुलांपर्यंत जाऊन त्यांच्या घराची माहिती गोळा केली गेली. स्वत: कार्याध्यक्ष मा. रामभाऊ डिंबळे यांनी सर्व मुलांच्या घरी भेटी दिल्या.

मुलांची जाण्यायेण्याची व्यवस्था :

सध्या चार वाहनांमधून (दोन सुमो आणि दोन - १७ आसनी वाहने) ७५ मुलांना आणले जाते. सरासरी उपस्थिती ६५ ते ७० असते.



**आशय प्रमुख :**

अठरा पगड विद्यालयात आगामी ३ वर्षांमध्ये घ्यावयाचे २० विषय व त्यांचे प्रमुख निश्चित केले गेले. त्यांची एक बैठक डॉ. संजय तांबट सरांच्याकडे झाली. सध्या प्रथम वर्षांत प्रामुख्याने ज्या विषयांवर लक्ष केंद्रित करायचे आहे असे ५ विषय ठरले. त्याप्रमाणे काम चालू आहे.

तासिका : आजवर विषयांच्या १० तासिका झाल्या. त्यात पुढील विषय झाले. पहिल्या महिन्याचे उद्दिष्ट हे मुलांचे लक्ष वेधून घेणे आणि त्यांना विद्यालयाबद्दल आपलेपणा वाटावा यासाठी उपक्रम घेतले तसेच विविध खेळ, क्षेत्र भेट आणि हस्त कौशल्यावर भर दिला. आजवर झालेले विषय पुढीलप्रमाणे -

- ससाधन मैदानी खेळ, ओरिगामी कलेची ओळख, विविध गाणी
- मानसशास्त्रीय चाचणी, जादूचे प्रयोग, तळजाई टेकडी भेट
- मनोरंजनात्मक खेळ, कथाकथन, फिल्म पाहणे आणि चर्चा, वाचन कौशल्य
- स्वयंअध्ययन कौशल्ये, गटकार्य, जोडीकार्य, समूहकार्य
- खेळातून गणिती कौशल्ये

❖❖❖

'SWA'-ROOPWARDHINEE MONTHLY MAHMAR / 2007 / 26609 24 / 12 / 2008
Concessional postage under Regd. No. PCW / 148 / 2020-22
DT. of Publication - 25th every month
Dt. of Posting - at Kasba Post Office, Pune on 25th of every month

प्रति, ____________________

____________________

____________________

'स्व'-रूपवर्धिनी - वर्ष तेरावे, अंक सातवा

❖ **संपादक :** श्री. जयंत शंकर कवठेकर, संपर्क दूरध्वनी क्र. (घर) २४२२१२९४, मो. ९४०४२३१८७२
❖ **संपादकीय सहाय्य :** सौ. मंजूषा कुलकर्णी, कु. अहिल्या धायगुडे, श्री. निलेश धायरकर
❖ **छपाई :** प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.
❖ सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत.
❖ आजीव सभासद फी - रू.१०००/- फक्त. चेक अथवा ड्राफ्ट 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने काढावा.

**हे मासिक 'स्व'रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक श्री. नंदकुमार कानडे, प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे २ येथे छापून व प्रकाशक श्री. ज्ञानेश नारायण पुरंदरे यांनी २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे-११ येथे प्रसिद्ध केले.**